रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १२९
www.ramprahar.com
सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने १२ ◆ किंमत ₹ २

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानले जनतेचे आभार



**मुंबई :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पत्र लिहिले आहे. पत्राच्या माध्यमातून त्यांनी जनतेचे आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील जनतेने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि दिलेल्या प्रेमाबद्दल त्यांच्या समोर नतमस्तक होतो, असे त्यांनी म्हटले. मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ-काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला, अश्या सर्वांचा मी कायम ऋणी राहीन, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रात म्हटले आहे.

### अंतरंग

‘आमदार प्रशांत ठाकूर विजयाचा षटकारही मारणार’ /३
लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्यकर्त्यांकडून अभिनंदन /५
आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी अभिनंदन छायाचित्रे /११








उरण विधानसभा मतदारसंघाचे
सलग दुसऱ्यांदा आमदार
मा. श्री. महेश बालदी
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
सलग चौथ्यांदा आमदार
मा. श्री. प्रशांत ठाकूर
यांचे मनःपूर्वक
अभिनंदन !
शुभेच्छुक
सुधीर घरत
जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी
ट्रान्सपोर्ट सेल (उत्तर रायगड)
राष्ट्रीय खजिनदार, भारतीय पोर्ट
अँड डॉक मजदूर महासंघ (B.M.S.)


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा
ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
भारतीय जनता पार्टी
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
कृष्णा पाटील
मा. सरपंच
भाजपा अध्यक्ष, प्रभाग क्र. २
पनवेल महानगरपालिका
शुभेच्छुक
श्री. कृष्णाशेठ पाटील
सामजिक विकास मंडळ, पडघे
मु. पो. पडघे, ता. पनवेल, जि. रायगड
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा
ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
शुभेच्छुक
श्री. दिलीप बाळाराम पाटील, अध्यक्ष
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
प्रभाग क्रमांक १२, कामोठे
श्री. मंदार पनवेलकर
(प्रशासकीय अधिकारी)
कै. बाळाराम धर्मा पाटील शिक्षण संस्थेचे
सुषमा पाटील विद्यालय ज्युनिअर कॉलेज
व सिनिअर नाईट कॉलेज कामोठे
(मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यम, )
पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग
(प्लॉट नं. ३९, सेक्टर ११, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.)
पदवीधर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा!
९६६४०४०८२४/८४२५८८८११४
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यास केंद्र, कामोठे
एस. एन. डी. टी. महिला मुक्त विद्यापीठ, मुंबई अभ्यास केंद्र, कामोठे
B.A./ B.Com. / M.A. / M.Com.


पनवेल विधानसभा
मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा
आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांत
ठाकूर
यांचे हार्दिक
अभिनंदन !
विजयाचा
चौकार
विशाल ठाकूर
राकेश म्हात्रे
राहूल म्हात्रे
शुभेच्छुक
इंडियनऑयल
IndianOil
श्री स्वामी समर्थ फ्युएल स्टेशन
इंडीयन ऑईलचे अधिकृत विक्रेते
मुंबई गोवा हायवे, NH-66, हॉटेल सागर पॅलेस शेजारी, मु. पो. जिते, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
E mail - shreeswamisamarth0205@gmail.com

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२९
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने १२ ◆ किंमत ₹२

# आमदार प्रशांत ठाकूर विजयाचा षटकारही मारणार -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : हरेश साठे**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या विकासाच्या जोरावर विजय मिळवत विजयाचा चौकार मारला. सामाजिक बांधिलकीने त्यांच्याकडून लोकहिताची कामे यापुढेही सुरूच राहणार आहेत, त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर विजयाचा षटकारही मारणार आहेत, असा ठाम विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांकडून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. त्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. त्यांनी या वेळी बोलताना सर्वांचे आभारही मानले. पनवेल विधानसभेचे नेतृत्व करताना आमदार प्रशांत ठाकूर जबाबदारीने काम करत आहेत, त्यामुळे वडील म्हणून आपल्याला अभिमान असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि त्यानंतर स्वतः हे देशाच्या विकासाचे मूळ उद्दिष्ट्य घेऊन काम करत आहे. आणि त्या विचारधारणेतून आमदार प्रशांत ठाकूर नेहमीच काम करतात. सर्वसामान्यांचा विचार त्यांच्या कार्यातून दिसत असल्याचे त्यांनी या वेळी अधोरेखित केले. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना मतदार संघाचा विकास आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी त्यांनी कायम उचलली आहे आणि त्यावर ते खरे उतरले आहेत. प्रत्येक समाजातील वर्ग आमदार प्रशांत ठाकूर यांना मानतो त्यामुळे त्यांची सामाजिक बांधिलकीने नाळ जोडली गेली आहे. आमदार प्रशांत ठाकूर पनवेलच्या विकासासाठी सतत काम करीत असतात आणि त्या अनुषंगाने त्यांनी स्वतः ला या कार्यात झोकून दिले आहे. चारवेळा निवडून येणे हे सहज नसते. लोकांची कामे केल्यानंतरच हे यश मिळत असते, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. आमदार प्रशांत ठाकूर या मतदार संघातील प्रत्येक घटकाचा विकास करण्यासाठी कटिबद्ध राहिले आहेत आणि यापुढेही राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पनवेलच्या दृष्टिकोनातून पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न येत्या वर्षात कायमस्वरूपी सुटणार आहे आणि त्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेले कष्ट कामी येत असल्याचे त्यांनी सांगितले. **(पान ५ वर..)**

---

**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी सलग चौथ्यांदा पनवेल मतदारसंघातून आमदार म्हणून विजयी होण्याचा मान पटकावला आहे. या विजयानंतर त्यांच्या आई शकुंतला ठाकूर तसेच कुटुंबियांनी औक्षण करून विजयी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.** (अधिक छायाचित्रे पान ९ वर..)





**मुंबई : पेण विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार रविशेठ पाटील यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले.**









## संपादकीय

# यतो धर्मस्ततो जय:

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीतील महायुतीच्या विराट, विक्रमी महाविजयाने महाराष्ट्राचे सत्तागणित पूर्णपणे पालटून टाकले आहे. यापुढे या राज्यात घडून येणाऱ्या राजकीय परिवर्तनाची ही नांदी आहे. या निकालाने महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचा सुस्पष्ट वरचष्मा निर्माण झाला आहे. भाजपने २०१४ पेक्षाही अधिक मोठा विजय नोंदवला आहे.

**महायुतीच्या महाराष्ट्रातील महाविजयाचे कौतुक करताना स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, महाराष्ट्राच्या मतदारांनी काँग्रेस पक्षाच्या विभाजनवादी राजकारणाचा पराभव केला असून एकतेचा संदेश दिला आहे. देशाला 'एक है तो सेफ है'चा महामंत्र दिला आहे, असे प्रतिपादन केले. महाराष्ट्राच्या राजकारणाला ही अनोखी कलाटणी मिळाली ती देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली. देवेंद्र फडणवीस यांच्या त्याग आणि निष्ठेचा हा विजय आहे. त्यांच्या त्यागातूनच पक्ष या विजयापर्यंत पोहचला आहे. त्यांची अफाट बुद्धिमत्ता आणि संयम यांमुळेच भारतीय जनता पक्ष आज महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या अभूतपूर्व विजयानंतरही देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या जनतेसमोर आम्ही नतमस्तक आहोत अशीच भावना व्यक्त केली. हा विजय आमची जबाबदारी वाढवणारा आहे. जनतेने दाखवलेल्या या विश्वासामुळे आम्हाला राज्यात यापुढे आणखी खूप काम करावे लागेल याची जाणीव आम्हाला असून जनतेने दाखवलेल्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही, असे उद्गार फडणवीस यांनी काढले आहेत. गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने जे काम केले त्याची ही पोचपावती आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला बसलेल्या फटक्यामुळे विधानसभेमध्ये महायुती जिंकणार की नाही असा प्रश्न विरोधकांकडून सातत्याने विचारला गेला, परंतु महायुती सरकारने राज्यात 'लाडकी बहीण योजने'ची लागलीच घोषणा केली आणि ही योजना गेम चेंजर ठरणार असे सारेच म्हणू लागले. या योजनेचा प्रभाव निश्चितपणे महाराष्ट्रातील या निकालावर दिसतो आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी त्यांच्या मतांचे दान महायुतीच्या पारड्यात टाकल्याचे चित्र राज्यात दिसते आहे. लक्षावधी महिलांची कृतज्ञता मतदानात उतरली आहे. याउलट 'भाजप संविधान बदलणार' आणि 'भाजप आरक्षण रद्द करणार' असे खोटे नरेटिव्ह घेऊन महाराष्ट्र जिंकायला उतरलेल्या काँग्रेस पक्षाला या राज्याने पुरते नाकारले आहे. पक्षाच्या या नीचांकी कामगिरीचे शिल्पकार ठरले आहेत अर्थातच लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी. राहुल गांधी यांनी एव्हाना राजकारणात वीस वर्षे पूर्ण केली आहेत, परंतु त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला प्रामुख्याने पराभवच पत्करावे लागले आहेत. महाराष्ट्रातील महायुतीचा विजय हा विकास, सुशासन आणि सामाजिक न्यायाचा विजय ठरला आहे. मतदारांनी घराणेशाहीला नाकारले आहे. काँग्रेस पक्षाला देशाला काय हवे आहे हे कळेनासे झाले आहे असे दिसते. देश अस्थिर झालेला लोकांना मान्य नाही. देशाच्या हितालाच जनतेचे प्राधान्य आहे. संविधान, आरक्षणाबाबत काँग्रेस पक्षाने लोकांची दिशाभूल केली, ती जनतेला अजिबात रुचलेली नाही. या देशात एकच संविधान असेल. त्या आधारावर कोणताही पक्ष समाजामध्ये फूट पाडू शकत नाही असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनीही शनिवारी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान संपूर्ण देशात लागू करणारे कोणी असतील तर ते देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत आणि महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी आहे.**

# अखेरच्या फेऱ्यांनी आमदार महेंद्र थोरवे विजयी



**खबरबात**
विजय मांडे

कर्जत विधानसभा मतदार संघात चुरशीची तिरंगी लढत होणार असे चित्र सुरुवतीला तयार झाले होते, परंतु जशी निवडणूक जवळ आली. तशी तिरंगी लढत न होता एकास एक सामना होईल असे चित्र निर्माण झाले आणि झालेही तसेच महायुतीमधील शिंदे शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे आणि अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्यात मतमोजणीच्या अगदी शेवटच्या फेरी पर्यंत चुरस होती. मात्र शेवटच्या पाच फेऱ्या थोरवे यांना लाभदायक ठरल्या आणि ते विजयी झाले. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नितीन सावंत यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

लोकसभा निवडणूक झाली त्यामध्ये महायुतीतील शिंदे गटाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले असेल तरी ते कर्जत विधान सभा मतदार संघात साडे सतरा हजार मतांनी पिछाडीवर राहीले होते. त्यांना महायुती असूनही बारणे यांना ७५ हजार ५३४ मते मिळाली आणि महाविकास आघाडीतील उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार संज्योग वाघेरे-पाटील यांना ९३ हजार १९४ मते मिळाली. महायुतीमध्ये भारतीय जनता पक्ष-शिवसेना शिंदे गट-अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असे सत्तेतील तीन मजबूत पक्ष तसेच आरपीआय आठवले गट आदी असताना बारणे कसे मागे पडले. याचे अंदाज बांधता बांधता विधानसभेची निवडणूक जाहीर झाली.

कर्जत विधानसभेची जागा महायुतीतून शिवसेना शिंदे गटाला देण्यात आली. त्यामुळे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांची उमेदवारी नक्की झाली होती. इकडे महाविकास आघाडीतून ठाकरे गटासाठी ही जागा सोडण्यात आल्याने अनिल परब यांचे समर्थक नितीन सावंत यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले. गेल्या अडीच वर्षांपासून कोणत्याही परिस्थितीत विधानसभेची निवडणूक लढवायचीच असे ठरवले रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांची कुचंबणा झाली. ते उमेदवारी साठी मातोश्री पर्यंत गेले असल्याचे समजले. त्यांनी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळते काय? यासाठीसुध्दा प्रयत्न केल्याचे ऐकिवात आहे, मात्र दोन्ही कडून उमेदवारी मिळविण्यात ते अपयशी ठरले आणि त्यांनी व त्यांच्याबरोबर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यांना शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष, आम आदमी पार्टी आदींनी जाहीर पाठिंबा दिला.

महेंद्र थोरवे आणि सुधाकर घारे यांनी शक्ती प्रदर्शन उमेदवारी अर्ज दाखल केले. उबाठाचे नितीन सावंत यांनीही शक्ती प्रदर्शन करून अर्ज दाखल केला परंतु थोरवे आणि घारे यांचे शक्तिप्रदर्शन ते गाठू शकले नाहीत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुध्दा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता, परंतु अर्ज दाखल करण्यासाठी तीन मिनिटे उशीर झाल्याने जे. पी. पाटील यांनी उमेदवारी अर्ज न भरताच परतावे लागले. थोरवे आणि घारे यांनी जाहिर सभा घेण्याचे टाळले, मात्र सावंत यांनी अगदी प्रचार संपण्याच्या दिवशी उबाठा शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या जाहीर सभेचे आयोजन केले, मात्र त्या सभेचा लाभ सावंत यांना झाला नाही.

प्रचार शिगेला पोहचला त्यावेळी सुधाकर घारे निवडून येणार अशी चर्चा कर्जत मतदार संघात होत होती. तर आमदार महेंद्र थोरवे ४०-५० हजार मतांनी सहज निवडून येतील. असे त्यांचे कार्यकर्ते छाती ठोकपणे सांगत होते. सावंत मागे पडल्याचे चित्र मतदानाच्या दोन दिवस आधी दिसू लागले. त्यामुळे थोरवे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये थोडीशी धाक धुक वाढली कारण सावंत यांची मते आयत्यावेळी घारे यांना पडतात की काय? असे त्यांना वाटत असावे. सावंत यांच्या तुलनेत थोरवे व घारे यांचे नियोजन उजवे होते. या दोघांच्या बाबतीत प्रत्येक गावात असलेली नाती गोती, आमदार व जिल्हा परिषद उपाध्यक्ष पद सांभाळताना प्रशासनाचा अनुभव हे त्यांना उपयोगी ठरणार होते. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते थोरवे यांचे काम करतील की नाही? इथ पर्यंतच्या चर्चा मतदार संघात उघडपणे होत होत्या. तिन्ही उमेदवारांनी गाव भेटी, गाव दौऱ्यांवर भर दिला. तिघांच्याही सौभाग्यवतींनी प्रचार कार्यात हातभार लावला. थोरवे व घारे यांचे थोरले बंधू धाकट्या भावासाठी संपूर्ण मतदार संघ फिरत होते. सावंत येथेच कमी पडले कारण त्यांची हाताच्या बोटावर मोजण्या इतकी नाती मतदार संघात आहेत.



मतदानाचा दिवस उजाडला. प्रमुख तीनही उमेदवार सकाळीच मतदान करून मतदार संघात फिरले. त्यांचे कार्यकर्ते मतदान आपल्याला कसे मिळेल यासाठी प्रयत्न करीत होते. मतदान शांततेत पार पडले. नाक्या-नाक्यावर अंदाजाच्या चर्चा रंगू लगल्या. सुधाकर घारे की महेंद्र थोरवे निवडून येणार हेच गुऱ्हाळ दोन दिवस सुरू होते. यावेळी घारे बाजी मारतील असे अंदाज काहींनी केले.अखेर २३ तारीख उजाडली. सकाळी आठ वाजण्यापूर्वीच उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी प्रशासकीय भवनात पोहचले. मतमोजणी सुरू झाली. पहिल्या काही फेऱ्यांमध्ये सुधाकर घारे यांनी आघाडी मिळवली. प्रशासकीय भवनाच्या बाहेर असलेल्या घारे यांच्या समर्थकांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर थोरवे यांनी आघाडी घेतली तेंव्हा त्यांच्या समर्थकांनी घोषणाबाजी सुरू केली. सव्वीस फेऱ्या होणार होत्या. एकोणीस फेऱ्यांपर्यंत घारे आघाडीवर होते. कर्जत तालुक्यातील मतमोजणी संपली. घारे यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला. वीसावी फेरी सुरू झाली. खालापूर तालुक्यातील मतयंत्रे उघडण्यास सुरुवात झाली. यामध्ये थोरवे यांनी चांगली आघाडी घेतली. पुढील सहाही फेऱ्यांमध्ये थोरवेंची आघाडी वाढत गेली आणि ते विजयी झाल्याचे जाहिर झाले. या निवडणूकीत सुधाकर घारे यांनी चांगली लढत दिली. असे त्यांचे कट्टर विरोधक सुध्दा मान्य करतात. आमदार थोरवे यांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा खूप फायदा झाला. त्यातच भारतीय जनता पक्ष, आठवले यांचा रिपब्लिकन पक्ष, विशेष म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन, माजी आमदार सुरेश लाड यांचा प्रामाणिक पाठिंबा, विविध पक्षातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात घेण्याचा सपाटा, मत यंत्रावरील पहिले बटन ही त्यांच्या विजयाची कारणे आहेत. तर घारे यांना पक्षाच्या निशाणीचा अभाव, दोन डमी सुधाकर घारे, नवीन निशाणी आदींमुळे त्यांना पराभवाला समोरे जावे लागले.

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅप व्हॉईस नोट्स टेक्स्टमध्ये बदलता येणार

तुम्ही जर व्हॉट्सअ‍ॅप एक्टिव्हली वापरत असाल तर तुमच्यासाठी एक आश्चर्यकारक बातमी आहे. आता कंपनीने असं फीचर आणलं आहे, जे तुमचं सर्वात मोठं टेन्शन दूर करेल. व्हॉट्सअ‍ॅपने व्हॉईस नोट्सला टेक्स्टमध्ये बदलणारं नवीन फीचर लॉन्च केलं आहे. आता तुम्ही व्हॉईस नोट्स ऐकण्याऐवजी वाचू शकता. जे लोक गर्दीच्या ठिकाणी आहेत, मीटिंगमध्ये आहेत किंवा फक्त व्हॉईस नोट्स ऐकण्याच्या मूडमध्ये नाहीत त्यांच्यासाठी हे फीचर खूप उपयुक्त आहे.




व्हॉईस नोट्सचं टेक्स्टमध्ये रूपांतर करणं खूप सोपं आहे. सर्वप्रथम सेटिंग्जवर जा, नंतर चॅट्सवर क्लिक करा आणि नंतर व्हॉईस मेसेज ट्रान्सक्रिप्शनवर जा. येथे तुम्ही हे फीचर सुरू किंवा बंद करू शकता आणि तुमच्या आवडीची भाषादेखील निवडू शकता. एकदा चालू केल्यावर व्हॉईस नोट्स टेक्स्टमध्ये रूपांतरित करणं खूप सोपं आहे. तुम्हाला फक्त व्हॉइस नोट दाबून धरून ठेवायला हवं आणि 'ट्रान्सक्राइब'वर क्लिक करा. अ‍ॅप त्वरित मेसेजचं टेक्स्ट व्हर्जन तयार करेल, जी तुम्ही तुमच्या सोयीनुसार वाचू शकता.

ही ट्रान्सक्रिप्शन प्रक्रिया पूर्णपणे तुमच्या डिव्हाईसवर होते. याचा अर्थ संपूर्ण प्रायव्हसीची खात्री करून तुमचे व्हॉईस मेसेज बाहेरच्या सर्व्हरवर पाठवले जात नाहीत. व्हॉट्सअ‍ॅपदेखील तुमच्या व्हॉईस नोट्सच्या सामग्रीमध्ये प्रवेश करू शकत नाही, जे युजर्सच्या सुरक्षितता आणि प्रायव्हसीसाठी त्याची वचनबद्धता दर्शवते.

व्हॉट्सअ‍ॅप नेहमी युजर्सच्या प्रायव्हसीला खूप महत्त्व देतं. या नवीन फीचरच्या बाबतीतही तेच आहे. जेव्हा तुम्ही व्हॉईस नोट्स टेक्स्टमध्ये रूपांतरित करता, तेव्हा सर्व काम तुमच्या फोनवर केलं जातं. व्हॉट्सअ‍ॅप किंवा इतर कोणतीही कंपनी तुमच्या व्हॉईस नोट्स पाहू शकत नाही. अशा प्रकारे तुमची गोपनीयता राखली जाते. हे नवीन फीचर, जे व्हॉइस नोट्सला टेक्स्टमध्ये रूपांतरित करण्याची परवानगी देते. हळूहळू जगभरातील सर्व युजर्ससाठी ते उपलब्ध होईल. सध्या हे फक्त काही भाषांमध्ये कार्य करतं, परंतु लवकरच आणखी भाषा जोडल्या जातील. त्यामुळे या फिचरचा चांगला उपयोग करता येणार आहे.

# नाट्यतपस्वी भालचंद्र पेंढारकर



**निमित्त**

भालचंद्र व्यंकटेश पेंढारकर ऊर्फ अण्णा पेंढारकर हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ नाट्य-अभिनेते, दिग्दर्शक, नाट्य-निर्माते आणि नेपथ्यकार होते. त्यांचा जन्म २५ नोव्हेंबर १९२१ रोजी हैदराबादमध्ये झाला.

भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. ते मेहनतीला कोठेही कमी पडत नसत. जेव्हा बालपणी त्यांनी निश्चय केला की आपल्याला गाणं शिकायचंय, त्यासाठी रात्रीचा दिवस केला. त्यांची आजी व आई त्यांना बापूराव पेंढारकरांच्या मृत्यूनंतर जेव्हा मुंबईला घेऊन आली, तेव्हा बापूरावांच्या चाहत्यांनी 'पेंढारकर ट्रस्ट' उभा केला.

अण्णांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी सांगितलं. त्या वेळी त्यांनी फक्त औपचारिक शिक्षण घेण्यास नकार दिला. त्यांना संगीताचं शिक्षण घ्यायचंच होतं. त्यांच्या आजी व आईनं त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. रोज सकाळी ५ ते ८ रियाज, मग पर्वतीवर व्यायाम, १० ते १२ शिकवणी, जेवण, पुन्हा संध्याकाळी ३ ते ८ शिकवणी. मग रात्री कुठेतरी गाण्याचा कार्यक्रम ऐकायला जायचं असं पाच वर्षं सुरू होतं.

ते दिवस खूप आर्थिक चणचणीचे होते. घरी आजी, आई आणि तीन लहान बहिणी. त्यातील दोन अपंग व अण्णा. एकच धोतर होतं त्यांच्याकडे. ते रात्री धुवायचे, पंचावर निजायचे अन् दुसऱ्या दिवशी पहाटे वझेबुवांकडे पळायचे. हेही दिवस सरले. रेडिओच्या कामानिमित्ताने बाबुराव देसाई यांची भेट झाली. त्यांना अण्णांची स्थिती समजली.

देसाईंनी संपूर्ण कुटुंबासह अण्णांना मुंबईत आपल्या घरी राहायला बोलावलं. 'ललितकलादर्श'चं पुनरुज्जीवन करायला लावलं आणि त्यासाठी संपूर्ण आधार दिला.

ललितकलादर्श या नाट्यक्षेत्रातील प्रतिष्ठित संस्थेचे प्रमुख या नात्याने त्यांनी अनेक संगीत नाटके रंगभूमीवर सादर केली. त्यात 'संगीत सौभद्र'सारखी पूर्वी गाजलेली नाटके होतीच, शिवाय 'पंडितराज जगन्नाथ', 'दुरितांचे तिमिर जावो', 'बावनखणी', 'जय जय गौरीशंकर', 'आनंदी गोपाळ' या नव्या नाटकांचाही समावेश होता. अभिनयासोबतच दिग्दर्शन, नेपथ्य, छायाचित्रण, नाट्य निर्मिती अशा अनेक क्षेत्रांत पेंढारकर लीलया वावरले. गिरगावच्या साहित्य संघातील त्यांचा वावर अनेक कलावंतांना मार्गदर्शक ठरला.

पेंढारकर यांनी संगीत, गद्य अशा सुमारे ५१ नाटकांमध्ये भूमिका केली होती. त्यांनी ललितकलादर्श संस्थेमार्फत १४ नाटकांची निर्मिती केली. विजय तेंडुलकर लिखित 'झाला अनंत हनुमंत', भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवरील 'रक्त नको मज प्रेम हवे' हे सुरेश खरे लिखित नाटक तसेच डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील 'आनंदी-गोपाळ' ही त्यातील काही प्रमुख नाटके होती.

पेंढारकर यांच्यावर ग्वाल्हेर गायकीचे संस्कार झाले होते. 'आई तुझी आठवण येते', 'जय जय गौरीशंकर' नाटकातील 'रमारमण श्रीरंग' ही त्यांच्या संगीत नाटकातील पदे अतिशय लोकप्रिय झाली. १९५५मध्ये प्रदर्शित 'अमर भूपाळी' चित्रपटात होनाजी यांची भूमिका पंडित नगरकर तर बाळा यांची भूमिका भालचंद्र पेंढारकर यांनी केली होती. अशा या नाट्यतपस्वीचे ११ ऑगस्ट २०१५ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




**मुरुड : समुद्रकिनारी पर्यटक वाढले. समुद्राच्या लाटांचा आनंद घेताना पर्यटक दिसत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# दुधात घाला पाच गोष्टी; सहज पचेल

दूध प्यायल्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. दूध गायीचं असो किंवा म्हशीचे, दूध प्यायल्याने शरीराला पौष्टीक घटक मिळतात. बरेच जण गायीचं दूध पिताना नाक मुरडतात. आजही कित्येक घरांमध्ये आई-वडील आपल्या मुलांना नाश्त्यासोबत दुधाचाही ग्लास देतात, कारण मुलांचा मेंदू आणि हाडांची योग्य पद्धतीने वाढ होण्यासाठी दुधातील पोषक घटक उपयुक्त आहेत, पण अनेकांना दूध व दुधाचे पदार्थ आवडत नाहीत किंवा पचत नाही.



योगगुरू बाबा रामदेव यांनी गायीचे दूध पिण्याचे पाच उपाय सांगितले आहे. जर दूध पचत नसेल, तर दुधात पाच गोष्टी मिसळून प्या. यामुळे दुधाच्या पौष्टीक्तेमध्ये वाढ होईल. यासह हाडेदेखील मजबूत होतील. हाडांच्या उत्तम आरोग्यासाठी दुधात कोणते पदार्थ मिसळावे हे पाहूया.

बाबा रामदेव म्हणतात, 'हाडांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी कॅल्शियमयुक्त पदार्थ खाणं गरजेचं आहे. दूध व दूधयुक्त पदार्थांमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे हाडं पोलादी होतात. ज्यांना ऑस्टियोपोरोसिस आणि ऑस्टियोपेनियाचा त्रास आहे. त्यांनी दुधात हळद मिसळून प्यावे. यामुळे हाडांच्या आरोग्याला भरपूर फायदा होईल.

हिवाळ्यात सर्दी-खोकल्याचा प्रचंड त्रास होतो. ज्यांची इम्युनिटी कमी असते त्यांना याचा त्रास होतो. अशा वेळी आपण दुधासोबत च्यवनप्राश मिक्स करून खाऊ शकता. यामुळे घसादुखी आणि पोटदुखीपासूनही आराम मिळतो. यामुळे पोटाचेही विकार दूर राहतात.

जर आपल्याला बद्धकोष्ठतेचा त्रास असेल, तर आपण गायीच्या दुधात हरडची पावडर घालून दूध पिऊ शकता. यासाठी हरड किसून किंवा त्याची पावडर कोमट दुधात घाला. रामदेव बाबा यांच्या मते, एका व्यक्तीने ग्लासभर दुधात दोन-तीन ग्राम हरड पुरेसे आहे. यामुळे पोटाचे विकार दूर राहतात.

थंडीत छातीत कफ जमा होण्याची समस्या सामान्य आहे. खोकल्यामुळे संसर्ग होण्याचा धोका वाढतो. यावर मात करण्यासाठी गायीच्या दुधात मुलेठी पावडर घालून प्यावे. या उपायाने खूप फरक पडतो. कफचा त्रास दूर होतो.

अनेकदा गायीचं दूध प्यायल्याने ॲसिडिटीचा त्रास होतो. यासाठी गायीच्या कोमट दुधात बडीशेप घालून पिऊ शकता. यामुळे ॲसिडिटीचा त्रास कमी होईल. पित्ताचाही त्रास होत असेल, तर आपण दुधात बडीशेप घालून पिऊ शकता.



विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, यांचे खूप खूप हार्दीक
अभिनंदन !
शुभेच्छुक
श्री. अभिजीत जाधव
श्री. सत्यवान नाईक
A. S. M. ENTERPRISES




पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
शुभेच्छुक
ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ
मा. नगरसेवक : पनवेल महानगर पालिका
मा. सभापती : सार्वजनिक बांधकाम, विकास व नियोजन समिती
अध्यक्ष : पनवेल वकील संघटना
प्रदेश निमंत्रित सदस्य : भारतीय जनता पार्टी
संयोजक महाराष्ट्र : ओ.बी.सी. मोर्चा (Head Quarter Delhi) रीसर्च अँड पोलिसी
उपाध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश भाजप ओ.बी.सी मोर्चा
उपाध्यक्ष (संघटन) : अखिल भारतीय अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा




विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
शुभेच्छुक
मच्छिंद्र सुदाम जाधव
आणि सुखम् परिवार
मो. नं. ९९८७७२९९८८
M. S. LOGISTICS
Fleet Owners & Transport Contractors
Panvel : Jasdanwala Complex, Visharali Naka, Old Panvel, Raigad - 410 206. Mob.: 9870028585
Email : sukhamhospital@yahoo.com
Karanjade : Beind Ganesh Temple, Ganesh Nagar, Karanjade. Ta-Panvel, Dist. Raigad. Tel. : 9136049988. Email : sukhamhospital@gmail.com





विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
शुभेच्छुक
गौरव अजय कांडपिळे
उपाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा भाजपा
(मोबा. नं. ९९२०९६८००८)
अजय यशवंत कांडपिळे
मा. नगरसेवक पनवेल,
मा. चेअरमन पनवेल को ऑप अर्बन बँक
हिन्दुस्तान पेट्रोलियम
HP
BHARATI AUTO CARE CENTRE
(Dealers of Hindustan Petroleum Corporation Limited)
Address: HP Petrol Pump, Survey No. 29/C, 30/0, Palidevad, Sukapur, Panvel, Raigad, Maharashtra 410206.
Email: bhartiautocare@gmail.com | gauravkandpile@yahoo.in




पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
विजयाचा चौकार
Vaibhav Thakur B.E. (Mech)
Mob. : 9930573057
Info@ompowersystem.com
Tushar Thakur D.E.E.
Mob. : 9594388899
www.ompowersystem.com
Office : 9619505152
शुभेच्छुक
वैभव ठाकूर
तुषार ठाकूर
OMS
OM POWER SYSTEM
AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY
Government Registered Contractor
Complete Solution For Your Electrical, Fabrication & Civil Work, Fabrication Works - Industrial Shed, Structural Fabrication, Building Turnkey Projects Electrical Work - Industrial Wiring, H.T./L.T., MSEDCL Power Sanctioning etc.
Office Address : 102, R. Residency, Plot- 39, Sec-19, Behind Hotel Malwan Tadka, Ulwe Node, Navi Mumbai - 410 206




विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, यांचे खूप खूप हार्दीक
अभिनंदन !
शुभेच्छुक
विकास ना. घरत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका (प्र. क्र. १३, कामोठे)
डॉ. अरुणकुमार शं. भगत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका (प्र. क्र. १३, कामोठे)

विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
उरण विधानसभा मतदारसंघाचे सलग दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
महेश बालदी
यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
शुभेच्छुक
के. अे. म्हात्रे
उपाध्यक्ष, पनवेल तालुका भाजपा
M/S. RAJ CONTRACTOR & ENGINEERS
Builders & Suppliers
At Dapoli, Post. Pargaon, Tal. Panvel, Pargaon, Tal. Panvel, Dist. Raigad





विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
शुभेच्छुक
श्री महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन
प्रोप्रा. मंगेश पिलविलकर




भारतीय जनता पार्टी शिवसेना+ राष्ट्रवादी+ आर.पी.आय. (अ.)
महायुतीचे उमेदवार
विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक
अभिनंदन !
उरण विधानसभा मतदारसंघाचे सलग दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री.
महेश बालदी
यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
शुभेच्छुक
प्रकाश ठाकूर
वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कारप्राप्त (महाराष्ट्र शासन)
परीक्षित ठाकूर
उरण तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी


पनवेल विधानसभा
मतदारसंघाचे
सलग चौथ्यांदा
आमदार
झाल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
साहेब,
यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स कर्मचारी सहकारी पतसंस्था, मर्यादित (पनवेल)
अरुण जनार्दन नाईक (सहकार तज्ज्ञ संचालक)
शशिकांत मुंबईकर (माजी सचिव)
जगदिश हरिश्चंद्र घरत (अध्यक्ष)
संदीप सत्यवान आंग्रे (सचिव)
विवेक चिंतामण कोळी (खजिनदार)
संतोष तुकाराम कडू (उपाध्यक्ष)
आनंदकुमार लाल (संचालक)
शिरीष सुधाकर थवई (सहखजिनदार)
भुपेश हरि कडू (संचालक)
ध्रुवनाथ नामदेव कोळी (संचालक)
तुकाराम श्रावण वाघे (संचालक)
मनिषा खेमचंद जैन (सहसचिव)
रजनी सुनील पाटील (संचालिका)
रवींद्र नामदेव म्हात्रे (कार्यलक्षी संचालक)


विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात
सलग चौथ्यांदा आमदार
मा. श्री. झाल्याबद्दल
प्रशांतदादा ठाकूर
यांचे हार्दिक
अभिनंदन !
J.B.S.P. SANSTHA PANVEL RAIGAD
ज.भ.शि.प्र.संस्था
शुभेच्छुक
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
(सचिव, ज. भ. शि.प्र. सं.)
सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी


विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात
सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
यांचे हार्दिक
अभिनंदन !
Ramsheth Thakur International Sports Complex RTISC
शुभेच्छुक
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व संचालक मंडळ, उलवे नोड, नवी मुंबई.
मा. श्री. परेश रामशेठ ठाकूर
(चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर)
मा. श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
(जनरल सेक्रेटरी )
सदस्य : श्री. रविंद्र बाळकृष्ण भगत, श्री. भार्गव रामदास ठाकूर, श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर, श्री. शिव शंकर सुमन, श्री. स्वप्निल अरूण ठाकूर, श्री. प्रतिक भरत ठाकूर, श्री. अभिजित उत्तमराव जाधव, श्री. अमोल यशवंत देशमुख, श्री. भुषण श्रीधर ठाकूर


उरण विधानसभा मतदारसंघाचे
सलग दुसऱ्यांदा आमदार
मा. श्री.
महेश बालदी
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
सलग चौथ्यांदा आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
यांचे मनःपूर्वक
अभिनंदन !
भारतीय जनता पार्टी
श्री. रामदास ठाकूर
श्री. भार्गव ठाकूर
शुभेच्छुक
मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफीस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६


विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर
यांचे हार्दिक अभिनंदन !
मा. कान्हाशेठ ठाकूर
प्रोप्रा. के. एच. ठाकूर
सौ. देवकाबाई कान्हाशेठ ठाकूर
अध्यक्षा, श्रमिक म. मंडळ, न्हावेखाडी, ता. पनवेल
उरण विधानसभा मतदारसंघात सलग दुसऱ्यांदा विजय संपादन केल्याबद्दल
मा. श्री. महेश बालदी साहेब
यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
शुभेच्छुक
अल्केश बैकर
रोशन ठाकूर
सम्राट ठाकूर
सागर ठाकूर
(सदस्य - ग्रामपंचायत न्हावे)
M/s. K. H. THAKUR
Railway & Govt. Contractor, P. Way (Track Work), Civil Work and Suppliers Of Building Material
Off. Gurukripa Apartment, Shop No. 1, Plot No. 123, Ground Floor, Opp : Telephone Exchange, Panvel - 410206. Dist. Raigad (Maharashtra)


उरण विधानसभा मतदारसंघाचे सलग दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. महेश बालदी
यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
MANOJ InfraWork Pvt. Ltd.
MANOJ ENTERPRISES
Civil Contractor & Concrete Plant Owner
Off :- 21/22, Second floor, Near Sukham Hospital, Jasdhanwala Office Complex, Panvel. 9870022236/02227468650. Email : manojent.2000@gmail.com
CHANDAN PATIL
MANOJ PATIL
CHAIRMAN
H. G. PATIL




विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
विजय चिपळेकर
मा. नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका














विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
उरण विधानसभा मतदारसंघाचे सलग दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. महेश बालदी यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
रवींद्र नाईक
शेखर तांडेल
विनायक मुंबईकर
चंद्रकांत कडू
शुभेच्छुक
भाजपा रायगड जिल्हा कामगार आघाडी
जय भारतीय जनरल कामगार संघटना
वंदे मातरम जनरल कामगार संघटना
जितेंद्र घरत
(अध्यक्ष)


विजयाचा चौकार
दमदार आमदार!
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
श्री. भुपेंद्र पाटील
मा. सदस्य, पं. समिती पनवेल
सरचिटणीस, पनवेल ता. भाजपा


विजयाचा चौकार
पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
MANSHREE ENTERPRISES
All Types Of Office & School Stationery Material Supplier
Address: Akash Deep society, Shop no.5,Old Thana Naka Road,Opp Kanak Sarovar, Panvel 410206


उरण विधानसभा मतदारसंघाचे सलग दुसऱ्यांदा आमदार
मा. श्री. महेश बालदी
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर
यांचे मनःपूर्वक अभिनंदन !
शुभेच्छुक
Raman N. Bohara
Balaji Stone Crushing Plant
Site : At. Bombavi Pada, Post Owle, JNPT, Ex. Highway, Near Gavhan Phata, Tal. Panvel, Navi Mumbai-410206.
Off. : 170, M. G. Rd., Mahavir Chowk, Behind Amantran Hotel, Panvel, Navi Mumbai. Tel. 022-27451406. Telefax : 022-27461800.


विजयाचा चौकार
कामगिरी दमदार!
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सलग चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
निलेश दमडे





**पनवेल :** विधानसभा मतदार संघातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयाचा चौकार मारला आहे तर आमदार महेश बालदी यांनी दुसऱ्यांना उरण मतदार संघाचे प्रतिनीधीत्व करण्याचा बहुमान मिळवला आहे. विजयी झाल्यानंतर दोघांनी प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांना अभिवादन केले. दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकनेते दि.बा.पाटील यांचे सुपूत्र अतुल पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे पनवेल जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे आदी उपस्थित होते.











































































उरण : आमदार महेश बालदी हे पुन्हा एकदा उरण मतदारसंघाच्या आमदारपदी निवडून आल्याबद्दल नगराध्यक्षा सायली म्हात्रे, भाजपचे तालूका अध्यक्ष रवी भोईर, महिला तालुकाध्यक्षा राणी म्हात्रे, शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, शेखर तांडेल, भाजप नेते सुशील राऊत, उरण पूर्व विभाग अध्यक्ष प्रवीण घासे, दिघोडेचे मा. सरपंच मयुर घरत, खोपटे सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, माजी नगरसेवक बबन मुकादम, कळंबुसरे उद्योगपती कुलदीप नाईक, भाजप नेते शशिकांत पाटील, निलेश पाटील, जविंद्र कोळी, ताराचे उद्योगपती बाळूशेठ पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, उरण तालुका उपाध्यक्ष मकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कळंबुसरेचे भाजप नेते सुरदास राऊत, रोशन पाटील, जितेंद्र पाटील, गणेश पाटील, युवा नेते प्रितेश मुकादम, प्रदीप नाखवा, प्रा. प्रमोद म्हात्रे आदींनी अभिनंदन केले.


श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक
विकास मंडळाचे अध्यक्ष
कामदार
आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा
ठाकूर
पनवेल विधानसभा
मतदारसंघात
सलग चौथ्यांदा
आमदारपदी
निवडून
आल्याबद्दल
हार्दिक
अभिनंदन !
TIPL
शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
• Tel. : 022 27452713, 9769409120
• Email : thakurinfraprojects@gmail.com
• Web : www.thakurinfraprojects.in